गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष २ रे | अंक ८४ वा | रविवार ११ ऑगस्ट २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-
| * Volume 2 | Issue 84 | Date : 11/08/2024 | blow Sunday | Page 4 Price 4

# 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'चा लाभ कायमस्वरूपी सुरू राहणार : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

धुळे : 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेमुळे महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होणार आहेत. त्यामुळे ही योजना कायमस्वरूपी सुरू राहणार आहे. येत्या १७ ऑगस्ट रोजी महिलांच्या बँक खात्यात जुलै, ऑगस्ट या दोन्ही महिन्याचे हप्ते वितरित करण्यात येतील. यानंतर अर्ज करणाऱ्या महिलांना एकाचवेळी तीन महिन्यांचे साडेचार हजार रूपये दिले जाणार आहेत. अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे महिला सक्षमीकरण मेळाव्यात महिला-भगिंनीना आश्र्वस्त केले. साक्री तालुक्यातील अनेक वर्षांपासून बंद असलेला पांझरा - कान सहकारी साखर कारखाना तसेच पंडित दीनदयाळ उपाध्याय सूत गिरणी सुरू करण्यासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

भाडणे, ता.साक्री येथे मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान मेळावा आज पार पडला. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा शुभारंभ व विविध शासकीय योजनांच्या लाभांचे महिलांना वितरण यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मान्यवरांच्या हस्ते भाडणे (ता.साक्री) येथील नवीन १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय तसेच एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल इमारतीचे ई - भूमिपूजन तसेच विविध विकासकामांचे उद्घाटनही पार पडले. जिल्हा प्रशासनाने तयार केलेल्या महिलांच्या सक्षमीकरणाच्या विविध योजनांच्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन मुख्यमंत्री व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या महिला सक्षमीकरण मेळाव्यास व्यासपीठावर आदिवासी विकास मंत्री डॉ.विजयकुमार गावित, सार्वजनिक बांधकाम ( सार्वजनिक उपक्रम) मंत्री



दादाजी भुसे, जिल्हा परिषद अध्यक्षा धरती देवरे, आमदार सर्वश्री किशोर दराडे, आमश्या पाडवी, जयकुमार रावल, आमदार मंजुळा गावित, जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, महापालिका आयुक्त अमिता दगडे पाटील आदी उपस्थित होते.

आजच्या कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अहिराणी या खान्देशी बोलीतून भाषणाला सुरुवात करत महिलांशी संवाद साधला. मुख्यमंत्री म्हणाले की, 'आठे जमेल शेतस् त्या समदा ताईसले मना नमस्कार.. तुमनाकरीता ह्या भाऊ नी मुख्यमंत्री मनी लाडकी बहीण हाई योजना आणेल शेतुमी अर्ज कया नाआते रक्षाबंधन ना पहले तुमना खाता मा ओवाळणी जमा होणार शे'.. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, आजचा महाविराट म्हणावा असा महिला सक्षमीकरणाचा मेळावा आहे. कुणी मला विचारले तर मी आता सांगेल की मला एक नाही लाखो - करोडो बहिणी आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची सुरुवात होऊन एक महिना झाला आहे. सुमारे दीड कोटी माता भगिनींनी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज केले आहेत. महिलांच्या हातात पैसा आल्यामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ऑगस्टनंतर बंद होणार असा अपप्रचार खोटा आहे. ही योजना बंद होण्यासाठी सुरु केलेली नाही. ती पुढेही कायम सुरूच राहणार आहे. या योजनेसाठी नुसता हाताने लिहिलेला म्हणजेच ऑफलाईन अर्ज सुद्धा स्वीकारण्यात येत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुद्धा या योजनेची माहिती घेऊन कौतुक केले असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. शासनाने गरीब घरातल्या मुलींना लखपती करणारी 'लेक लाडकी योजना' सुरू केली. यात मुलगी अठरा वर्षांची झाल्यावर तिला एक लाख रुपये मिळेल याची व्यवस्था करण्यात आली आहे. २५ लाख लखपती दीदी शासन तयार करत आहे. आतापर्यंत १५ लाख लखपती दीदी झाल्या आहेत. महिलांना स्वत: त्यांच्या पायावर उभे राहाता यावे यासाठी म्हणून पिंक रिक्षा देण्यात येत आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, अडीच लाख । पान २ वर

## अजित पवारांनी कधी जातीचं राजकारण केलं नाही, राज ठाकरेंची स्तुतीसुमने

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

मुंबई : महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात जातीपातीचं राजकारण चालू आहे, असा महाराष्ट्र मी यापूर्वी कधीही पाहिला नव्हता, असं म्हणत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सत्ताधारी आणि विरोधी पक्षांवर टीका केली आहे. राज ठाकरे हे बीडमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. ते म्हणाले, जातीपातीचं राजकारण टोकाला पोहोचलं आहे. असा महाराष्ट्र तुम्ही यापूर्वी कधी पाहिला होता का? तुम्ही सर्व पत्रकार मंडळी अनेक वर्षांपासून मराठवाड्यात काम करत आहात, तुम्ही तरी कधी असा महाराष्ट्र पाहिला होता का? मला कधीकधी वाटतं की सर्वांनीच स्वतःला विचारायला हवं की आपण व आपलं राज्य कधी असं होतं का?



मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे सातत्याने ज्येष्ठ नेते शरद पवार (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष) व उद्धव ठाकरे (शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख) यांच्यावर टीका करत आहेत. तसेच जातीपातीच्या राजकारणाची सुरुवात शरद पवारांनी केली असा आरोप राज ठाकरे यांनी आतापर्यंत अनेक वेळा केला आहे. त्यावरून राज ठाकरे यांना प्रश्र्न विचारला की तुम्ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबद्दल फार बोलत नाही. त्यावर राज ठाकरे म्हणाले, मी अजित पवारांबद्दल तुम्हाला एक गोष्ट सांगतो ते पूर्वी शरद पवारांबरोबर होते, पवारांचं जातीचं राजकारण चालू होतं जेम्स लेन वगैरे प्रकरण चालू होतं मी तुम्हाला खात्रीलायक सांगतो की अजित पवार हे कधी जातीच्या राजकारणात पडले नाहीत आणि ही गोष्ट निश्र्चित आहे.

## अनुसूचित जाती-जमाती आरक्षणामध्ये क्रीमी लेअर लागू करणार नाही केंद्र : खासदारांना पंतप्रधान मोदींनी दिले आश्वासन

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

नवी दिल्ली : अनुसूचित जाती-जमातींच्या आरक्षणात क्रीमी लेअर लागू होणार नाही, असे आश्र्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी संसद भवनात १०० मागासवर्गीय खासदारांना दिले. सुप्रीम कोर्टाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी एससी-एसटीमध्ये क्रीमी लेअर लागू करण्याचाही विचार केला पाहिजे, असे म्हटले होते. त्यावर खासदारांनी पंतप्रधानांना निवेदन देऊन चिंता व्यक्त केली होती.भाजपचे ओडिशातील खासदार रवींद्र नारायण बेहरा यांनी भास्करला सांगितले की, सर्वांनी एकमताने पंतप्रधानांकडे सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी न करण्याची मागणी केली. त्यावर, एससी-एसटी आरक्षणात क्रीमी लेअरचा समावेश केला जाणार नाही, असे आश्र्वासन पंतप्रधानांनी दिले. बेहरा यांच्या म्हणण्यानुसार, मोदी म्हणाले की सरकार या निर्णयाचा बारकाईने अभ्यास करत आहे. क्रीमी लेअर ओळखण्याबाबत सुप्रीम कोर्टाचा कोणताही निर्णय नाही, पण एकच सूचना आहे. खासदारांनी म्हटले की, या निर्णयाची अंमलबजावणी



करणे बंधनकारक नाही. भाजप खासदार ब्रिजलाल म्हणाले की, पंतप्रधानांनी त्यांचे विचार काळजीपूर्वक ऐकून त्यांच्या भावनांसोबत उभे राहण्याचे आश्र्वासन दिले. खासदार डॉ. सिकंदर कुमार म्हणाले, आमच्या चिंतेवर पंतप्रधानांनी खासदारांच्या भावनांनुसार काम करू असे आश्र्वासन दिले आहे.

लोकसभेत प्रश्र्नोत्तराच्या तासादरम्यान शिवसेना ठाकरे गटचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी क्रिमीलेयरबाबत सर्वोच्च न्यायालयाचा मुद्दा उपस्थित केला होता. यावर उत्तर देताना केंद्रीय कायदामंत्री अर्जून मेघवाल यांनी सांगितलं की, एससी आणि एसटी उपवर्गीकरणामध्ये क्रिमीलेयरचा संदर्भ हे सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे निरीक्षण आहे, निर्णयाचा भाग नाही. त्यानंतर काही खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. पंतप्रधान मोदीही क्रिमीलेयरच्या विरोधात असल्याचं भाजपा खासदारांनी सांगितलं. आम्ही पंतप्रधांनांना । पान २ वर

## सोलापूर विमानसेवेसाठी परवानगी मिळण्याचा मार्ग अंतिम टप्प्यात

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधी : एकीकडे बोरामणी आंतरराष्ट्रीय कॉर्गो विमानतळ उभारणी रखडलेली असताना दुसरीकडे सोलापूरच्या होटगी रस्त्यावरील जुन्या विमानतळावरील बहुप्रतीक्षित विमानसेवा उशिरा का होईना, अखेर सुरू होण्याची चिन्हे स्पष्ट झाली आहेत. येत्या सप्टेंबरमध्ये विमानसेवेचा परवाना मिळाल्यानंतर पुढील ऑक्टोबरमध्ये प्रत्यक्ष विमानसेवा सुरू होण्याची अपेक्षा आहे.सोलापूरचे सध्याचे छोटेखानी, जुने विमानतळ अवघे ३५० एकर क्षेत्रफळ आकाराचे आहे. या विमानतळावरून यापूर्वी फेब्रुवारी २००९ मध्ये सोलापूरचे तत्कालीन पालकमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या पुढाकाराने किंगफिशर रेड कंपनीने आठवड्यातून चार दिवस मुंबई-सोलापूर-मुंबई दरम्यान ७२ आसनी विमानसेवा सुरू केली होती. त्यास चांगला प्रतिसाद मिळत असतानाच अचानकपणे ही विमानसेवा ऑगस्ट २०१० मध्ये बंद झाली. त्यानंतर गेली १४ वर्षे सोलापूरची विमानसेवा प्रतीक्षेत राहिली असताना दुसरीकडे तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी केंद्रातील वजन वापरून सोलापूरजवळ बोरामणी परिसरात सुमारे दोन हजार एकर जमीन संपादित करून आंतरराष्ट्रीय कॉर्गो विमानतळ उभारण्याचा मार्ग खुला केला होता.

आवश्यक भूसंपादन होऊनही या आंतरराष्ट्रीय विमानतळाची विमानसेवा आजतागायत रखडली आहे. यात वन विभागाच्या आरक्षित जमिनीचा अडसर असल्याचे सांगितले जाते. परंतु त्यावर मार्ग निघाला नाही. या पार्श्र्वभूमीवर जुन्या विमानतळाच्या माध्यमातून २०१७ मध्ये मोदी सरकारने देशात जाहीर केलेल्या उडान योजनेत सोलापूरचाही समावेश केला होता. परंतु विमानतळावरील त्रुटी दूर करता आल्या नाहीत. त्यामुळे उडान योजनेच्या माध्यमातून सुरू होणारी विमानसेवा दृश्य पटलावर कधीही आली नाही.अलीकडे विमानतळाला लगतच्या सिद्धेश्र्वर सहकारी साखर कारखान्याच्या सहवीजनिर्मिती प्रकल्पाच्या उंच चिमणीचा अडथळा असल्याचे सांगण्यात आले असता, त्यावर मोठा वाद झाला. अखेर वादग्रस्त चिमणी गेल्या वर्षी पाडण्यात आली. त्यानंतर विमानतळ सुसज्ज करून प्रत्यक्ष विमानसेवा सुरू करण्याचे आव्हान उभे ठाकले होते. यात लोकप्रतिनिधींच्या इच्छाशक्तीचा अभाव दिसत असताना सुदैवाने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी स्वतः या प्रश्र्नावर उच्च स्तरावरून पाठपुरावा केला. त्याचे चांगले परिणाम आता दिसू लागले आहेत. विमानतळाच्या सुधारणांसाठी प्रथमच जिल्हा नियोजन समितीने आर्थिक निधी उपलब्ध करून दिला आहे.

## निष्पक्ष व भयमुक्त वातावरणात निवडणुका पार पाडण्यात नोकरशाहीची भूमिका महत्त्वाची : मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम

*** मतदार याद्या बिनचूक असाव्यात याबाबत दक्षता घ्यावी * लोकसभा निवडणुक २०२४ पार पाडण्यासाठी झालेला खर्च १४ ऑगस्टपर्यंत शंभर टक्के खर्च झाला पाहिजे * शाळा-महाविद्यालयातील अठरा वर्षे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी**

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः लोकशाहीच्या बळकटीकरणात नोकरशाहीचाही सहभाग मोठा व महत्त्वाचा असतो. त्यामुळे नोकरशाहीने निष्पक्ष व भयमुक्त वातावरणात निवडणुका पार पाडण्यासाठी अत्यंत तटस्थपणे आपली भूमिका पार पाडली पाहिजे, असे आवाहन राज्याचे प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित विशेष मतदार यादी पुनरिक्षण कार्यक्रम अंतर्गत आयोजित आढावा बैठकीत श्री चोक्कलिंगम मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उप जिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, स्वीप चे नोडल अधिकारी सुधीर ठोंबरे व सर्व उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी, तहसीलदार उपस्थित होते.

चोक्कलिंगम पुढे म्हणाले की, आगामी निवडणुका यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सर्वांनी अत्यंत जबाबदारीने काम करावे. विशेष मतदार यादी पुनरिक्षण कार्यक्रम अंतर्गत मतदार यादया अत्यंत बिनचूक होतील याची संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व मतदार नोंदणी अधिकारी यांनी खात्री करावी. मतदार यादीतून नावांची वगळणी करत असताना निवडणूक आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे कार्यवाही करावी. स्थलांतरित होणाऱ्या मतदाराबाबत संबंधित जिल्ह्याच्या उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याशी समन्वय ठेवून नावे । पान २ वर



**चोक्कलिंगम यांची रामवाडी गोदामाला भेट व पाहणी:-**

मुख्य निवडणूक अधिकारी श्री. चोक्कलिंगम यांनी आज सकाळी रामवाडी येथील निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर ईव्हीएम मशीन ठेवलेल्या गोदामाला भेट देऊन ईव्हीएम मशीनची प्रथम स्तरीय तपासणीची पाहणी केली. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी उपस्थित होते.

# संपादकीय

## लक्षात घ्यायला हवे...

निवडणुका असोत किंवा नसोत सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांना व्यासपीठ मिळाले की टाळ्यांचे वाक्य फेकण्याचा मोह होतो. महाराष्ट्राने यापूर्वी असे अनेक वक्ते देशाला दिले आहेत. पण सध्या महाराष्ट्राच्या राजकारणाच्या पटलावर जी काही डायलॉगबाजी सुरू आहे ती पाहता व्यासपीठ गाजवण्याच्या हेतूपेक्षाही ज्याच्यावर टीका करत आहात त्याला दुखावण्याचा हेतूच जास्त दिसत आहे. गेल्या पाच वर्षांच्या कालावधीमध्ये मुळातच महाराष्ट्राच्या राजकारणाने वेगळे वळण घेतले आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या दोन महत्त्वाच्या पक्षांमध्ये फूट पडली. त्यानंतर विखारी संवादाच्या माध्यमातून त्या त्या पक्षांची मते बाहेर येत आहेत. गेल्या काही दिवसांमध्ये सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी फेकलेले डायलॉग पाहता सर्वांनाच 'तोल मोल के बोल' हा सल्ला देण्याची गरज वाटू लागली आहे. खरेतर सामाजिक जीवनात वावरणाऱ्या राजकीय पक्षांच्या नेत्यांनी नेहमीच तोलून मापून बोलणे आणि वागणे अपेक्षित असते. कारण त्यांच्या बोलण्याचा आणि वागण्याचा कोणता अर्थ घेतला जाईल याची कोणतीच खात्री देता येत नाही. विशेषतः आधुनिक कालावधीमध्ये सोशल मीडिया प्रचंड प्रमाणात सक्रिय असताना राजकीय पक्षांच्या नेत्यांना सावधगिरीनेच आपला संवाद साधावा लागतो. पण जेव्हा या संवादाचे रूपांतर डायलॉगमध्ये होते तेव्हा मात्र सर्व मर्यादा उलटून जातात आणि केवळ प्रतिपक्षाच्या नेत्यांना मानसिकरीत्या जखमी करणे हा एकच हेतू बाकी राहतो. माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी गेल्या आठवड्यामध्ये विद्यमान उपमुख्यमंत्री आणि भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून केलेली एकेरी टीका असो किंवा एखादा इशारा असो किंवा त्यानंतर पुणे येथे झालेल्या जाहीर सभेमध्ये केलेली जहरी टीका असो यामधून फक्त समोरच्या नेत्यांना दुखावण्याचाच हेतू समोर येत आहे. एकेकाळी महाराष्ट्राचे राजकारण सर्वात सुसंस्कृत राजकारण आहे अशा प्रकारचा उल्लेख देशपातळीवर केला जात असे. पण आज देशातील इतर कोणतेही राज्य आदर्श राजकारण करणारे राज्य म्हणून महाराष्ट्राचा उल्लेख करतील असे वाटत नाही. महाराष्ट्रातील सर्वच प्रमुख नेत्यांनी आपल्या या विखारी डायलॉगबाजीला वेळीच आवर घातला नाही तर बिहार या राज्याचा जसा गुंडगिरी प्रतीत करण्यासाठी विशेषण म्हणून वापर केला जातो तसाच एक नकारात्मक विशेषण म्हणून देशाच्या राजकारणामध्ये महाराष्ट्राच्या नावाचा वापर सुरू होईल हे सर्वांनीच लक्षात घ्यायला हवे.

## शिक्षक-पालक संवाद काळाजी गरज

सर्व पालकांना एक शिक्षक म्हणून माझा सप्रेम नमस्कार. तुम्ही ही कोणत्या ना कोणत्या तरी शाळेचे जागरूक पालक आहात. त्याचा आम्हा सर्वांना खूप अभिमान आहे. मुलां ची जडण-घडण शिक्षकांच्या हाती असते हे आपले म्हणणे सर्व पालकाना पटणारे आहे. पण एक प्रामाणिक शिक्षक या नात्याने आजच्या शिक्षकांना थोडेसे पटत नाही.त्यासाठीच आज मी पालकांसोबत संवाद करू इच्छितो.

मुलांचा शिक्षकांवर अपार विश्र्वास असतो. अगदी पालकांपेक्षाही जास्त. पालक घरी मुलांना प्रेम, माया, ममता देतात , पण शिस्तीच्या बाबतीत ते आजकाल कमी पडत आहेत. नेमके पालक ज्या बाबतीत कमी पडत आहेत तिच शिस्त शाळेत लावताना आम्हालाही काही बंधने घातली जात आहेत. पण शिक्षक म्हणून आम्ही यातून मार्ग काढत असतोच पण पालकांनी ही सामजस्याची भूमिका ठेवली पाहिजे कारण दोघांची ही काळजी मुलांचे भविष्य हीच आहे.. मुलांचे गैरहजर राहणे, शाळेत उशिरा येणे, अभ्यास करणे न करणे, खोडकरपणा यांची कारणे विचारावेच लागतात. चूक असल्यास प्रथम प्रेमळ शब्दात समजावू. तरीही बदल न झाल्यास सौम्य शिक्षा करावी लागते. अशा वेळी पालकांनी शिक्षेचा उहापोह करू नये. कारणांची चौकशी करावी,

शिक्षेचे स्वरूप पटले नाही तरी मुलांना या गोष्टी जाणवू देऊ नका. उलट गुरुजीनी केले ते योग्य केले असे मुलाला सांगा. नियमित शाळेत येत चला. तुमच्या येण्याने,सुसंवादाने विचार जुळतील. मुलांच्याही सर्व गोष्टींवर याचा निश्र्चित सकारात्मक फरक दिसून येईल . मुलांचे बालमन हे प्रेमळच असते.पण आजकाल ते कटू का बनत आहेत याचा विचार करूया. न्याय-अन्याय, हिंसा, बदला हे शब्द मोठ्या माणसांचे.हे विचार टी. व्ही. मोबाईल नको त्या वयात मुलांपर्यंत पोहचलेत.त्याच गोष्टी आज आमच्या शालेय संस्कारावर भारी पडत आहे. पालक म्हणून तुम्ही मुले काय करतात,काय पाहतात,काय वाचतात, मित्रमंडळी कोण आहेत हे जाणून घ्या.त्यासाठी तुम्ही धावपळीच्या या जगात थोडा वेळ काढून बारकाईने मुलांवर लक्ष दया.

पालक म्हणून कॉपी मुक्त, परिक्षांना समर्थन दया. मुलांना ही त्यासाठी तयार ठेवा. यातून कमी गुण मिळाले तरी कौतुक करा. त्यांना धीर दया. पाठीवर मायेचा हात फिरवा. त्याला प्रोत्साहीत करून् पुन्हा तयारीला सांगा. त्याच्या आवडीच्या क्षेत्र निवडीला साथ दया, त्यासाठी निरंतर मदत करा.

तुम्ही पालक सभांना नियमित - शाळेत येत जा. मुलांनी तयार केलेली परसबाग बघा,रोपवाटीका बघा. फुलझाडांनी बहरलेला शालेय परिसर बघा, त्यांनी नवकौशल्याने बनवलेले साहित्य पहा. कारण ते केवळ विदयार्थी नाहीत तर तो खेळाडू, स्वयंसेवक, उत्तम वक्ता,अभिनेता, समाजसेवक, वृक्षप्रेमी, सहकार्यवृत्तीचा मित्र बनलेले आहेत. त्यांना प्रत्यक्षात समजून घ्या. आजची पिढी निर्भय आहे. संकटाना भयभीत होत नाही. ही प्रयत्नशील व हिंमतवान आहे. फक्त गरज आहे ती योग्य मार्गदर्शनाची व चांगल्या संस्काराची. त्यांच्या नवनवीन विचारांना, प्रयत्नांना योग्य दिशा देण्याचे काम शिक्षक-पालकांना मिळून करायचे आहे.

या सर्व गोष्टी जर यशस्वी करायच्या असतील तर शिक्षक-पालक यांच्या सु-संवादाची नितांत गरज आहे, हे मात्र नक्की. **-प्रभाकर यशवंत गायकवाड, सहशिक्षक**

# तर पंढरपूर विधानसभा निवडणूकीच्या मतदानावर बहिष्कार घालणार; अखिल भारतीय सफाई मजदूर संघटनेने दिला प्रशासनास इशारा

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः अखिल भारतीय सफाई मजदूर संघटनेच्या वतीने पंढरपूर नगरपरिषद येथील प्रलंबित वारसा हक्काने अर्ज केलेल्या अर्जदारांना शासन निर्णय २४ /०२/२०२३ व २६/ ०२/२०१४ नुसार लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने नोकरीत समाविष्ट करण्याबाबतचे लेखी निवेदन संघटनेच्या वतीने देण्यात आले मागणी मान्य न झाल्यास अन्यथा ९ ऑगस्ट क्रांतीदिना दिवशी बेमुदत सत्याग्रह आंदोलन संघटनेने पुकारले होते सदर आंदोलनाच्या निवेदनासंदर्भात पंढरपूर नगरपालिकेने सदर आंदोलन मागे घेण्याबाबत लेखी पत्र दिलेले आहे पण सदर पत्रामध्ये नगरपालिकेने चुकीची व दिशाहिन माहिती संघटनेला देऊन शासन निर्णयाची पायमल्ली केलेली आहे याबद्दल पंढरपूर नगरपालिकेचा संघटनेच्यावतीने जाहीर निषेध करण्यात आला व त्या प्रतिची होळी करण्यात आली.तसेच सोलापूरचे जिल्हाधिकारी आशिर्वाद यांनी आश्र्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले असून १९ ऑगस्टपर्यंत संघटनेच्या मागण्या मान्य न झाल्यास येणाऱ्या विधानसभा निवडणूक मतदानावर बहिष्कार टाकणार असल्याचे निवेदन आज शुक्रवार दि.९ ऑगस्ट रोजी पंढरपूर नगर पालिकेला देऊन सदर आंदोलन तूर्तास स्थगित केलेले आहे अशी माहिती तालुकाध्यक्ष गुरू दोडिया यांनी दिली.या निवेदनात म्हटले आहे, लाड पागे वारसा हक्काच्या शिफारसी मध्ये वारसा हक्काने नोकरी देण्यासंदर्भात शासनाची भूमिका शासन निर्णय २००३ मध्ये लाड पागे समितीच्या शिफारशी केल्यानुसार उमेदवारांसाठी नोकर भरती करताना त्यांचे वारस जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात यावे ते चालू ठेवावे याबाबत आवशयक असल्यास त्यांच्या सेवा भरतीचे नियम शिथिल करून त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी असे शासनाचे धोरण आहे तर शासन निर्णय २०१४ मध्ये एकही वारस वारसा हक्काने नोकरीपासून वंचित राहू नये ही शासनाची भूमिका आहे तसेच शासन निर्णय २०२३ मध्ये सेवानिवृत्त, स्वेच्छानिवृत्त, वैद्यकीय अपात्र किंवा मयत झाल्यावर सफाई कामगारांच्या बाबतीत संबंधित कर्मचाऱ्यास /कर्मचाऱ्यांच्या कुटुंबास वारसा हक्काच्या तरतुदी बाबत सविस्तर माहिती देण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांची आहे संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांनी सदर तरतुदी बाबत संबंधित सफाई कामगार / वारस कुटुंबास अवगत केलेले नसल्यास सेवानिवृत्त ,स्वच्छ निवृत्त ,वैद्यकीय पात्र किंवा मयत सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या प्रकरणांमध्ये संबंधित सफाई कामगारांच्या वारसांना विहित मुद्दतीत अर्ज सादर करण्याची अट क्षमापित करून संबंधित पात्र वारसास वारसा हक्काने नियुक्ती देण्याबाबत नियुक्ती प्राधिकारी यांनी कार्यवाही करावी असे शासनाचे निर्देश आहे या शासनाच्या निर्णयाची पंढरपूर नगरपालिकेने पायमल्ली केलेली आहे तसेच पंढरपूर नगरपालिका सफाई कामगारांच्या वारसाना वारसा हक्कापासून वंचित ठेवण्याचा घाट घालत आहे पंढरपूर नगरपालिका वरिष्ठ अधिकाऱ्यांचेही निर्देश धाब्यावर ठेवत आहे म्हणून पंढरपूर नगरपालिका प्रशासनावरती शिस्तभंगाची व अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायद्यानुसार कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना निवेदन देणार आहोत.

९ ऑगस्ट क्रांती दिना दिवशी सत्याग्रह आंदोलन होणार होते सदर आंदोलनाचे निवेदन सोलापूर जिल्हाधिकारी कुमारजी आशीर्वाद साहेब यांना दि. ०७/०८/२०२४ रोजी संघटनेच्या वतीने देण्यात आले होते त्यावेळी जिल्हाधिकारी साहेब यांनी सध्या पंढरपूर नगरपालिकेचे मुख्यधिकारी जाधव हे रजेवर आहेत म्हणून सदर आंदोलन आपण स्थगित करावे मुख्यधिकारी आल्यानंतर या संदर्भात आपण बैठक लावू असे तोंडी आश्र्वासन दिल्यामुळे जिल्हाधिकारी साहेब व जिल्हा प्रशासन अधिकारी विनाताई पवार मॅडम यांच्या आश्र्वासनास मान देऊन व संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष चरण सिंगजी टाक साहेब, प्रदेशाध्यक्ष दिलीपजी चांगरे साहेब, प्रदेश सचिव बालीजी मण्डेपू,संघटक सायमन गट्टू,श्रीनिवास रामगल,दशरथ आडगूळ याच्या सुचनेनूसार सदर आंदोलन तूर्तास स्थगित केलेले आहे.

पंढरपूर नगरपालिकेने सदर आंदोलनाबाबत संघटनेला दिलेल्या पत्राचे निषेध करण्याकरिता वारसदार मोठ्या संख्येने नगरपालिकेत उपस्थित झाले होते. ९ ऑगस्ट २०२४ रोजी संघटनेच्या वतीने पुकारण्यात आलेले बेमुदत सत्याग्रह आंदोलन जिल्हाधिकारी यांच्या आश्र्वासनानंतर तूर्तास १९/०८/२०२४ पर्यंत स्थगित करीत आहोत जिल्हाधिकारी साहेब यांनी आश्र्वासनानुसार बैठक लावून न्याय द्यावा अन्यथा १९ ऑगस्ट नंतर बेमुदत बैठा सत्याग्रह आंदोलन पंढरपूर नगरपालिकेचे कार्यालयासमोर कार्यालयीन वेळेत होणार व येणाऱ्या विधानसभा निवडणूक मतदानावर बहिष्कार टाकणार याप्रमाणे निवेदन आज रोजी पंढरपूर नगर पालिकेला देऊन सदर आंदोलन तूर्तास स्थगित केलेले आहे.

यावेळी संघटनेचे तालुकाध्यक्ष गुरु दोडिया, उपाध्यक्ष काशिनाथ सोलंकी, सचिव महेश गोयल, संघटक कल्पेश गोयल, सचिन मेहडा, अमित वाघेला, प्रमोद वाघेला, हेमंत मेहडा, राजन गोयल, योगेश मेहडा, रमेश सोलंकी, लुकेश परमार, प्रवीण सोलंकी, राजू वाघेला, जया वाघेला, सीता गोयल, मीना वाघेला, नीता वाघेला, भावना गोयल, सोनू गोयल, शीला मेहडा, किरण सोलंकी यांच्यासह मोठ्या संख्येने अर्जदार उपस्थित होते.

पान १ वरुन

## 'मुख्यमंत्री माझी लाडकी

महिला स्वयंसहायता समूहांना कर्ज दिले आहे. ज्येष्ठांना देवदर्शनासाठी मुख्यमंत्री तीर्थक्षेत्र दर्शन योजना सुरू करण्यात आली. पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना सुरु केली आहे. मुलींना उच्च शिक्षण मोफत करण्यात आले आहे. एसटीच्या तिकिटात महिलांना ५० टक्के सवलत देण्यात आली आहे. मुख्यमंत्री वयोश्री योजनेत वयोवृद्ध महिलांना सुद्धा वैद्यकीय सुविधांचा लाभ मिळणार आहे. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेत वर्षातून तीन सिलेंडर मोफत देण्यात येणार आहेत. तरूणांसाठी सुद्धा मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केला आहे. शेतकऱ्यांना एक रूपयात पीक विमा योजना राबविणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे. मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेत शेतकऱ्यांना ७.५ अश्र्वशक्ती वीजपंप असणाऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. असेही त्यांनी सांगितले.

**घरोघरी तिरंगा अभियानात सहभागी होण्याचे आवाहन**

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, ९ ते १५ ऑगस्ट दरम्यान देशात घरोघरी तिरंगा अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात सर्व शासकीय कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था, नागरिक यांनी १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान प्रत्येकांनी घरावर, दुकानावर राष्ट्रध्वज फडकवावा, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

**स्वतः मुख्यमंत्र्यांनी भरला लाडकी बहीण योजनेचा फॉर्म**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभासाठी जनाबाई वाघ या बहिणीचा फॉर्म स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भरला आणि त्यावर तिची सही घेऊन तो फॉर्म जिल्हाधिकारी यांच्याकडे मंजूरी प्रक्रियेसाठी सुपूर्द केला. यावेळी आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावित, आमदार जयकुमार रावल, आ.आमश्या पाडवी यांनी ही आपले मनोगत व्यक्त केले.

**लाभांचे प्रातिनिधीक स्वरुपात वितरण**

या सोहळ्यात विविध योजनांच्या लाभार्थी महिलांना प्रमाणपत्राचे व लाभांचे प्रातिनिधीक स्वरुपात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. यामध्ये तनुजा लिंगायत, कु.दीक्षा सोनवणे, वैष्णवी मराठे ( मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना), आसमा याकुब मन्सुरी, जनाबाई वाघ, इंदुबाई गायकवाड, सुरैय्या जाकीर ( १५०० रुपये दरमहा सानुग्रह अनुदान ), स्वामी महिला बचत गट - भाडणे, (१० हजार जोखीम प्रवणता निधी), सिध्दीविनायक महिला बचत गट - भाडणे (समुदाय गुंतवणुक निधी ६० हजार रुपये), कुसूम रौंदळे ( नोंदणीकृत बांधकाम कामगारास अत्यावश्यक सुरक्षा संच वाटप), पुजा सोनवणे (नोंदणीकृत कामगारास गृहपयोगी संच वाटप), योगिता पारधी ( केंद्रवती अर्थसंकल्प योजनेतंर्गत अर्थसहाय्य योजना), मनिषा पाटील (मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम), सविता बारीस ( बिरसा मुंडा कृषी क्रांति योजना), मोनिका गवळी ( प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना), सोनाली गोरे (मोदी आवास योजना), विद्याबाई मराठे (प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया योजना ), वंदनाबाई बारसे ( इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ योजना), नलिनी देवरे (ड्रोन दिदी), वैष्णवी पाटील, पुजा चव्हाण (नवनियुक्त तलाठी नियुक्ती पत्र ) या महिला लाभार्थ्यांना लाभाचे वाटप करण्यात आले. यातील काही महिलांनी शासकीय योजनांच्या लाभामुळे जीवनमानात झालेल्या बदलाविषयी मनोगत व्यक्त केले.या सोहळ्यास पारंपरिक वेशभूषेत पेहराव करुन महिला सहभागी झाल्या होत्या. सर्वधर्मीय महिलांनी व्यासपीठावर जाऊन मुख्यमंत्र्यांना राखी बांधली व त्यांच्याशी संवाद साधला. याप्रसंगी महिलांना तिरंगा भेट देऊन हर घर तिरंगा मोहीमेचा शुभारंभ करण्यात आला. स्थानिक आदिवासींनी आपल्या पारंपरिक नृत्यांचे मुख्यमंत्र्यांसमोर बहारदार सादरीकरण केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्यमंत्र्यांचे महिलांनी मोबाईल टॉर्चच्या प्रकाशात स्वागत केले. व्यासपीठावरील मान्यरांनी मुख्यमंत्र्यांचे तीरकमान, पावरी वाद्य व वीर एकलव्य यांची मुर्ती देऊन स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आमदार मंजुळा गावित यांनी केले. सूत्रसंचालन जितेंद्र सोनवणे, पुनम बेडसे यांनी तर आभार जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी मानले.

## निष्पक्ष व भयमुक्त वातावरणात ..

वगळणे अथवा मतदार यादीत ठेवण्याची कार्यवाही करावी, असेही त्यांनी सुचित केले.

जिल्ह्यातील १८ ते १९ वयोगटातील मतदारांची मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी शाळा महाविद्यालयात विशेष मोहीम राबवावी. या गटातील मतदारांची मोठ्या प्रमाणावर मतदार म्हणून नोंदणी होण्यासाठी प्रयत्न करावेत. प्रारूप मतदार या प्रत्येक राजकीय पक्षाला त्वरित पोहोच कराव्यात. तसेच या याद्या प्रत्येक मतदान केंद्रावर प्रसिद्ध होतील याची खात्री करावी. सर्व मतदारांनी मतदार यादीत आपले नाव आहे की नाही याची खात्री आत्ताच करणे आवश्यक आहे, ऐनवेळी मतदानाच्या दिवशी मतदान यादीत नाव नसल्याबाबतच्या तक्रारी येतात, त्या होऊ नयेत यासाठी संबंधित मतदारांनी व प्रशासनाने ही योग्य खबरदारी घ्यावी, असे आव्हान मुख्य निवडणूक अधिकारी श्री. चोक्कलिंगम यांनी केले.

आगामी विधानसभा निवडणूकच्या पार्श्र्वभूमीवर जि .पी. एस. ट्रॅकिंग सिस्टीम व वेब कास्टिंग प हे राज्यस्तरावरून प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच निवडणुकीच्या अनुषंगाने सर्व संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी चांगला अभ्यास करावा व तंत्रज्ञानाचा वापर निवडणूक कामकाज अधिक सुलभ व गतीने कशा पद्धतीने करता येईल यावर अधिक भर द्यावा, असे श्री. चोक्कलिंगम यांनी सांगून लोकसभा निवडणूक २०२४ अनुषंगाने सोलापूर जिल्ह्याचा ५७ कोटीचा खर्च झालेला असून राज्याकडून २२ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आलेले होते. त्यापैकी फक्त ११ कोटीचा खर्च झालेला दिसून येत आहे. तरी १४ ऑगस्ट २०२४ पर्यंत शंभर टक्के खर्च होण्याच्या दृष्टीने सर्व उपविभागीय अधिकारी यांनी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी निर्देशित केले.

प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी १ जुलै २०२४ च्या अहर्ता दिनांकावर आधारित प्रारूप मतदार यादी दिनांक ६ ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या असून पाच राजकीय पक्षांनी सदरील याद्या घेऊन गेलेले असून उर्वरित पक्ष प्रतिनिधींना त्वरित याद्या पोहोच करण्यात येणार आहेत. दिनांक ६ ऑगस्ट रोजी जिल्ह्यात एकूण ३६ लाख ९२ हजार ४०९ इतके मतदार असून मतदान केंद्राच्या संख्येत १२४ ने वाढ होऊन सध्या ३ हजार ७२३ इतकी मतदान केंद्रांची संख्या आहे.

लोकसभा निवडणुकीनंतर ३५ हजार ५७६ इतकी मतदार संख्या वाढलेली आहे. मतदार नोंदणी प्रलंबित अर्ज, वयानुसार मतदार संख्या, फॉर्म नंबर ६ ची सद्यस्थिती, होम टू होम सर्वे ची माहिती तसेच स्वीप कार्यक्रमाची सविस्तर माहिती त्यांनी यावेळी दिली.

## अनुसूचित जाती-जमाती आरक्षणामध्ये

सांगितलं की एससी एसटीच्या क्रिमीलेयरबाबतचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय लागू करू नये. यावर याची अंमलबजावणी करू नये, असं पंतप्रधानांनी सांगितलं, असं माजी मंत्री आणि खासदार फग्गनसिंग कुलस्ते यांनी पत्रकारांना सांगितलं.

अनुसूचित जाती-जमातींसाठीही ओबीसींप्रमाणे क्रिमीलेअरचे तत्त्व लागू करण्याच्या सूचना न्यायालयाने बहुमताने दिल्या असल्या तरी त्याचे निकष स्वतंत्रपणे ठरविण्याची मुभा दिली आहे. त्यामुळे त्यासाठी कौटुंबिक वार्षिक उत्पन्नाच्या मर्यादेबरोबरच अन्य निकषही ठरविता येऊ शकतील. मात्र केंद्र किंवा राज्य सरकार आगामी विधानसभा निवडणुका लक्षात घेता त्या दृष्टीने निर्णय घेण्याची शक्यता खूपच कमी आहे. एखाद्या पिढीलाच आरक्षण मिळावे, असे मत एका न्यायमूर्तींनी व्यक्त केले आहे. मात्र त्याचे राजकीय पडसाद लक्षात घेता सरकार त्याबाबत कोणताही निर्णय घेणार नाही.

दलित अत्याचार प्रतिबंधक कायद्यातील (अॅट्रॉसिटी) तरतुदींसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने काही वर्षांपूर्वी निकाल दिला होता.दरम्यान शिष्टमंडळाने पंतप्रधानांची भेट घेतली. या भेटीचे फोटो पंतप्रधानांनी एक्सवर शेअर केले असून, आज एससीएटी खासदारांच्या शिष्टमंडळाची भेट घेतली. एससी एसटी समुदायांच्या कल्याणासाठी आणि सक्षमीकरणासाठी आमच्या वचनबद्धतेचा आणि संकल्पाचा पुनरुच्चार केला, असं ते म्हणाले.

संसदेच्या दोन्ही सभागृहातील १०० हून अधिक एसटी आणि एससी भाजपा खासदारांचा समावेश असलेल्या शिष्टमंडळाने पंतप्रधानांना निवेदनही सादर केले. शिष्टमंडलाचा भाग असलेले भाजपाचे राज्यसभा खासदार सिकंदर कुमार म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर एससी आणि एसटी समुदायातील अनेक खासदारांना त्यांच्या मतदारसंघातून फोन येत आहे. त्यांनी तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# बैलपोळ्यापूर्वी सहकार शिरोमणी वसंतराव काळे कारखाना प्रलंबित सर्व देणे देणार : चेअरमन कल्याण काळे

**दैनिक यशसिद्धी न्यूज**



पंढरपूर/प्रतिनिधीः भाळवणी येथील सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या मागील गळीत हंगाम २०२३२४ मधील औषधा प्रलंबित उजविले यंदाच्या हंगाम २०२४२५ साठी ऊस तोडणी वाहतुकीसाठी पहिला आडवांस बैलपोळ्यापूर्वी देण्यात येईल असे प्रतिपादन कारखान्याचे अध्यक्ष कल्याणराव काळे यांनी केली

कारखान्या गळीत हंगाम २०२४२५ च्या २६व्या गळीत हंगामासाठी कारखान्यातील देखभाल दुरुस्तीचे काम सुरू असून त्या अंतर्गत मेन रोड ची पूजन कारखान्याचे व्हाईस चेअरमन भारत सोपान कोळेकर यांच्या शुभहस्ते आणि चेअरमन मा श्री कल्याणराव काळे व संचालक मंडळाचे प्रमुख उपस्थितीत यांच्या संपन्न झाली यावेळी ते बोलत होते कल्याणराव काळे पुढे म्हणाले की कारखाना व्यवस्थापनाने मागील गळीत हंगाम ऊस तोडणी वाहतूक केलेल्या वाहन चालकांना ३४ टक्के प्रमाणे होणारी कमिशनची रक्कम आणि डिपॉझिट रक्कम यापूर्वी दिलेली आहे. यांनाच्या हंगामात संचालक मंडळांनी चार लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट निश्चित केलेले आहे त्याची संपूर्ण तयारी झालेली असून येणाऱ्या गळीत हंगाम दैनंदिन गाळप अक्षरे एवढा ऊस उत्पादन होण्यासाठी २०० ट्रॅक्टर २५० बैलगाड्या व दीडशे बजाज गट गाड्यांची करार केलेली आहेत काही बैलगाड्या व बजाटाणा पहिला हप्ता देण्यात आला असून उर्वरित वाहनांना पहिला हप्ता आणि गदगळीत हंगामातील शेवटच्या टप्प्यातील राहिलेली ऊस बिले बैलपोळ्यापूर्वी देण्यात येतील कारखाना कार्यक्षेत्रातील व कार्यक्षेत्राबाहेरील ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यांनी आपला संपूर्ण व सहकार चिनावणी कारखान्याचे गळीत हंगामासाठी द्यावा असे आव्हाने कल्याणराव काळे यांनी केली. प्रारंभी कारखान्याचे संस्थापक स्वर्गीय वसंतराव काळे यांच्या प्रतिमेचे पूजन व श्री विठ्ठल रुक्मिणीचे पूजन करण्यात आले यावेळी कारखान्याची संचालक मोहन नागटिळक अण्णा शिंदे. जयसिंह देशमुख संतोष कुमार भोसले युवराज दगडे परमेश्र्वर लामकाने सुनील पाटील अमोल माने अरुण नलावडे सुरेश देटे कारखान्याचे प्रभारी कार्यकारी संचालक पीडी घोगरे टेक्निकल जनरल मॅनेजर थोरात डेप्युटी चीप इंजिनिअर लेडी पांढरे चिप अकाऊंटर बबन सोनवणे वरचे सोपे सर कुंभार सभासद शेतकरी अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# नागपंचमीला झोका बांधण्यासाठी मोठी झाडे नसल्याने महिला वर्गामध्ये नाराजी : दुर्गा भोर

**दैनिक यशसिद्धी न्यूज**



पंढरपूर/प्रतिनिधीः आधुनिकीकरणाकडे जाताना परंपरा सुद्धा जपली पाहिजेत कुमारी दुर्गाभोर अध्यक्ष दुर्गा ब्रिगेड संघटना महाराष्ट्र राज्य यांची शासनाला विचारणा. नागपंचमी सण म्हटलं की ग्रामीण भागातून आणि पूर्वी शहरी भागातून अनेक झोके बांधायचे पाहायला मिळायचे नागपंचमी निमित्त महिला या झोक्यावरून आनंद लुटायच्या पाहायला मिळायचे परंतु सध्याच्या आधुनिक काळात पर्यावरणाचा ऱ्हास झाला असून शहरीकरणामुळे झाड नाहीशी झालेली दिसत आहे

त्यामुळे आज नागपंचमी सण असला तरी महिला वर्गात नाराजी असल्याने दुर्गा ब्रिगेड संघटनेच्या संस्थापक अध्यक्ष दुर्गा भोर यांनी सांगितले आहे त्यांनी आपल्या याबाबत प्रतिक्रिया देत सांगितले की शहरांमध्ये वाढते शहरीकरण पाहता शहरात कामाच्या निमित्ताने विविध ठिकाणी ग्रामीण भागातून अनेक महिला वर्ग हा आलेला आहे परंतु नागपंचमी सारख्या सणांना अनेक ग्रामीण भागामध्ये खूप मोठे महत्त्व आहे अनेक ठिकाणी हा सण दिवाळी सारखा ग्रामीण भागामध्ये नागपंचमीच्या निमित्ताने अनेक महिलांनी आपल्या सणातील खंत दुर्गा ब्रिगेड संघटना अध्यक्ष दुर्गा भोर यांच्याकडे मांडले आणि पुढील काळामध्ये शहरांमध्ये नागपंचमी सारख्या सणांना महिला वर्गात झोका बांधण्यासाठी मोठ्या वृक्षांची निर्मिती झालीच पाहिजे जेणेकरून आपली परंपरा ही आपली जपली जाईल आणि येणाऱ्या पिढीला अशा सणाचे महत्त्व समजेल असे मत दुर्गाभोर अध्यक्ष दुर्गा ब्रिगेड संघटना आणि आज त्यांनी प्रसिद्ध माध्यमातून मांडली

# कर्मयोगी स्वर्गीय सुधाकरपंत परिचारक यांच्या पुण्यस्मरणानिमित्त भाळवणी ते मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**दैनिक यशसिद्धी न्यूज**



पंढरपूर/प्रतिनिधीः पांडुरंग परिवार युवक आघाडी आणि प्रणव परिचारक युवा मंच यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार तपस्वी कर्मयोगी स्वर्गीय सुधाकरपंत परिचारक यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणार्थ मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर (लेन्स बसवून) आज प्राथमिक आरोग्य केंद्र भाळवणी येथे प्रथम शिबिराचे उद्घाटन सर्व ज्येष्ठ मंडळी युवा सहकारी आरोग्य केंद्रातील स्टाफ यांच्या हस्ते पार पडले.या शिबिरामध्ये १६५ नागरिकांनी तपासणी करून घेतली यामध्ये पन्नास रुपये मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरले आहे लवकरच या पात्र उन्हाची मोफत शस्त्रक्रिया केली जाणार आहे याप्रसंगी आदरणीय मोठ्या मालकाप्रती लोकांची असलेली प्रेम आणि आठवण बघून मन भरवले या शिबिरातून सर्वार्थाने स्वर्गीय सुधाकर आजोबांच्या संस्कारानुसार समाजासह लोकांना दृष्टी देण्याचे काम होत आहे असे शिबिराचे आयोजक युवा नेते प्रणव परिचारक यांनी सांगितले. यावेळी भाळवणी आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी पांडुरंग परिवारातील ज्येष्ठ मार्गदर्शक मंडळी तरुण सहकार्य मित्र प्राथमिक आरोग्य केंद्र भाळवणी डॉक्टर नर्सेस आरोग्य कर्मचारी इत्यादींनी परिश्रम घेतली

# पुण्यातील मनोज तरंगे पाटील यांच्या रॅलीची तयारी पूर्ण

**दैनिक यशसिद्धी न्यूज**



पंढरपूर/प्रतिनिधीः अखंड मराठा समाज पुणे जिल्ह्याच्या वतीने येत्या रविवारी दिनांक ११ रोजी मराठा आरक्षण जनजागृती शांतता रॅलीचे आयोजन करण्यात आले या रॅलीचे मनोज जरांगे पाटील सहभागी होणार आहेत सारसबाग येथून सकाळी अकरा वाजता पायी रॅली सुरुवात होणार असून बाजीराव रस्ता शनिवार वाडा मार्गे जंगली महाराज रस्त्याने डेक्कन येथील खंडोजी बाबा चौक येथे रॅलीची सांगता होण्या होणार आहे रॅलीमध्ये मराठा समाज मोठ्या संख्येने प्रमाणावर सहभागी होणार आहे असून या दृष्टीने तयारी करण्यात आली आहे

रविवारी सकाळी अकरा वाजता सारसबाग येथील अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकास अभिवादन करून पायी रेडी ची सुरुवात होईल बाजीराव रस्ता शनिवार वाडा या मार्गे शिवाजीनगर येथील मिलिटरी स्कूल येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून जंगली महाराज रस्त्याने रॅली मार्गस्थ होणार आहे झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या पुतळ्यास अभिवादन करून जंगल महाराज रस्त्याने पुढे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याचा अभिवादन करून डेक्कन येथील खंडोबा होणार आहे रॅलीमध्ये सहभागी होणारे नागरिकांसाठी विविध ठिकाणी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे अरणेश्र्वर येथील शिवाजी महाराज सोसायटीचे मैदान टिळक रस्त्यावरील न्यूली स्कूलचे मैदान आरटीओ येथील एम आय एम एस चे मैदान फरगुशन कॉलेजचे मैदान डेक्कन क्यून येथील नदीपात्र आधी ठिकाणी वाहने पार्किंगची व्यवस्था करण्यात आली असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे रॅली यशस्वी होण्यासाठी दोन हजारापेक्षा अधिक स्वयंसेवक नियोजनात काम करीत आहे

# स्वेरीच्या ९ विद्यार्थ्यांची 'विप्रो पारी प्रा. लि.' या कंपनीत निवड

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः 'विप्रो पारी प्रा. लि.' या बहुराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील ९ विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्युवद्वारे निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.

'विप्रो पारी प्रा. लि.' या नामांकित कंपनीच्या निवड समितीने गोपाळपूर येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यांनी या निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून अमित अभिमन्यू पाटील, गोविंद ज्ञानेश्र्वर पवार, अभिजित विकास खुळे, अर्जुन विजयकुमार पाटील, आशुतोष दर्लिंग माने, अविष्कार गोरख उबाळे, रितेश गणेश चव्हाण, शिवराज तानाजी मगर, यश राजेश बागेवाडीकर या ९ विद्यार्थ्यांची निवड केली. या विद्यार्थ्यांना प्रत्येकी वार्षिक रु.३.८ लाखांपर्यंतचे पॅकेज मिळाले आहे. 'विप्रो पारी प्रा. लि.' ही कंपनी १९९० साली स्थापन झाली असून सध्या ती रोबोटिक्स आणि ऑटोमेशन या क्षेत्रात कार्यरत आहे. सध्या १३०० पेक्षा जास्त कर्मचारी या कंपनीमध्ये कार्यरत आहेत. या कंपनीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना देशात तसेच विदेशातही काम करण्याची संधी मिळणार आहे. या कंपनीने आज पर्यंत २५ पेक्षा जास्त देशांत आपल्या सर्व्हिसेस दिल्या आहेत. १९९८ साली स्थापन झालेल्या स्वेरी अभियांत्रिकीमधून प्लेसमेंटच्या माध्यमातून आजपर्यंत हजारो विद्यार्थ्यांना नोकऱ्या देण्यात आल्या आहेत. स्वेरीचे विद्यार्थी आज विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यात आपले उत्तम करिअर घडवीत आहेत. 'स्वेरी' मधून विविध कंपन्यात प्लेस होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे सध्याच्या आकडेवारीवरून दिसून येते. विद्यार्थ्यांना ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागामार्फत स्वतंत्रपणे कुशल प्रशिक्षकांद्वारे एप्टीट्युड, कम्युनिकेशन स्कील, टेक्निकल स्कील, विविध सॉफ्टवेअर्स, मॉक इंटरव्युव्ह यांचे प्रशिक्षण दिले जाते. स्वेरीमध्ये वार्षिक परीक्षांचे उत्कृष्ट निकाल, संशोधने, मानांकने, इन्फ्रास्ट्रक्चर याबरोबरच विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून करिअरच्या दृष्टीने सर्वात महत्वाच्या




समजल्या जाणाऱ्या प्लेसमेंटकडे देखील अधिक लक्ष दिले जाते व मोठमोठ्या कंपन्यांना हवे तसे प्रशिक्षणार्थी विद्यार्थी घडविण्यासाठी प्रशिक्षित तज्ञांकडून उत्कृष्ट मार्गदर्शन केले जाते. सदर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट व संबंधित विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्र्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार, उपप्राचार्य डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी कॅम्पस इंटरव्युवमधून निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# नवनिर्वाचित तहसीलदार म्हणून जीवन भिकाजी बनसोडे यांनी कार्यभार स्वीकारला

**दैनिक यशसिद्धी न्यूज**



इंदापूर/अतुल सोनकांबळेः इंदापूरचे तत्कालीन तहसीलदार श्रीकांत पाटील यांची बदली झाल्यानंतर इंदापुर तहसील कार्यालयास तहसीलदार म्हणून जीवन बनसोडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.जीवन बनसोडे यांनी यापूर्वी चंद्रपूर,नागपूर, मोहोळ व जत येथे तहसीलदारपदी काम केले आहे. प्रशासनात अनेक वर्ष जीवन बनसोडे यांनी अत्यंत सक्षमपणे व शिस्तबद्धपणे आपला पदभार सांभाळला आहे. गुरुवारी दुपारी ५ च्या सुमारास आपल्या पदाचा कार्यभार जिवण बनसोडे यांनी स्वीकारला. तहसीलदार कॅबिनमध्ये आत शिरताना दरवाजाच्या उंबरठाचा खाली वाकून विनम्रपणे नमस्कार केला.आणि खुर्चीवर जाऊन स्थानापन्न झाले.

त्यांनी कार्यभार घेताच सहकाऱ्यांचा परिचय करून घेतला. सायंकाळच्या ७:३० वाजेपर्यंत तहसील कार्यालयात असणाऱ्या विविध विभागात प्रत्यक्षपणे जाऊन विभागाची माहिती जाणून घेतली.गैरहजर असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचीही माहिती त्यांनी घेऊन काहींना त्यांनी तंबीही दिली.तहसीलदार यांनी महसूल विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सर्वसामान्य जनतेची कामे ही कोणत्याही प्रकारची आडवणूक व हेलपाटे न देता त्यांना सहकार्य करण्याचे सूचना त्यांनी केली आहे. तहसीलदार जीवन बनसोडे यांचा आजपर्यंतचा कामाचा अनुभव पाहता इंदापूर तालुक्यातील सर्वसामान्य जनतेला नक्कीच याचा फायदा होणार आहे.

# केंद्र शाळा दत्तनगर येथे निवृत्त कॅप्टन प्रकाश खोत यांच्या उपस्थिती मध्ये क्रांती दिन उत्साहात साजरा

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

टाकळीवाडी/प्रतिनिधीः ९ ऑगस्ट १९४२ साली महात्मा गांधी यांनी चले जावं ही घोषणा देऊन इंग्रजांना भारतातून हुसकावून लावले.या दिवसाच्या प्रित्यर्थ क्रांती दिन संपूर्ण भारतात साजरा केला जातो.या दिनाचे महत्व सर्व विद्यार्थ्यांना कळावे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, राष्ट्राभिमान जागृत व्हावे यासाठी सैनिक टाकळी येथील निवृत्त कॅप्टन श्री प्रकाश खोत सर यांच्या उपस्थित क्रांती दिनाचा कार्यक्रम साजरा झाला. निवृत्त कॅप्टन श्री प्रकाश खोत यांनी आपल्या २८ वर्षातील सैनिकी प्रवास खूप सुंदर व सोप्या भाषेत मुलाना सांगितले. अंगावर शहारे आणणारे प्रसंग मुलांच्या डोळ्यासमोर आणून त्यांनी मुलांना देश सेवेसाठी प्रोत्साहित केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सन्नके सर,ज्येष्ठ शिक्षक सुतार सर, शिनगारे मॅडम, कोठावळे मॅडम, कांबळे सर, विद्या पाटील मॅडम, युवराज पाटील सर, प्रितम गवंडी सर शबाना मॅडम आणि शाळा व्यवस्थापन समिती सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार आमच्या मार्गदर्शिका निवृत्त शिक्षिका बागे मॅडम यांनी सैनिकांवर काव्य सादर करून केले.




# उपजिल्हा रुग्णालय निफाड अंतर्गत बेटी बचाव अभियान निमित्त विविध स्पर्धांचे आयोजन

**दैनिक यशसिद्धी न्यूज**



निफाड/प्रतिनिधी : जिल्हा रुग्णालय नाशिक येथील कार्यरत जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे , निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप सूर्यवंशी यांचे आदेशान्वये उपजिल्हा रुग्णालय निफाड येथील कार्यरत वैद्यकिय अधिक्षक डॉ.राजीव तांभाळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे योजना करण्यात आले होते.समाज्यात समाज प्रबोधन व्हावे या दृष्टीने बेटी बचाव या कार्यक्रमा अंतर्गत वैनतय ज्युनिअर कॉलेज निफाड येथे लेक वाचवा, लेक शिकवा, याविषयावर *निबंध स्पर्धा, पोस्टर स्पर्धा,रांगोळी स्पर्धा, कविता स्पर्धा आयोजित करण्यात आली . यामध्ये विद्यार्थी व विद्यार्थिनींचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. प्रत्येक स्पेधेतून प्रथम, द्वितीय व तृतीय असे एकूण १२ नंबर काढण्यात आले. या कार्यक्रमाला उपस्थित उपजिल्हा रुग्णालय निफाडचे वैद्यकीय अधीक्षक व डॉ कविता कदम, दंत शल्यचिकित्सक, औषध निर्माण अधिकारी, पराग चव्हाण, अधिपरीचारिका श्रीमती शिंदे, श्रीमती पेखले (कंटाळे), समुपदेशक , नितिन परदेशी तसेच प्राचार्य सोनवणे त्यांचे सह प्राध्यापक उपस्थित होते.

# पंढरपूर शहर तालुक्यात शिवसेना ठाकरे गटाकडून भगवा सप्ताह अभियानास सुरुवात

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी: शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून राज्यभरात हिंदुहृदय सम्राट,शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराचा महाराष्ट्र घडवण्यासाठी व शिवसेना पक्षप्रमुख महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली भगवा सप्ताह अभियान राबिवण्यात येत आहे. महाराष्ट्र पुन्हा प्रगतिशील वैभशील बनवण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व महिला आघाडी, सर्व युवा सेना शिवसेना आजी-माजी पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत पुनर्बांधणी करण्यासाठी हा भगवा सप्ताह राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.गुरुवार दिनांक ८ ऑगस्ट रोजी पंढरपुरात शिवसेना उद्धव ठाकरे सेनेकडून भगवा सप्ताह अभियानास सुरुवात झाली. मराठवाडा समन्वयक विश्र्वनाथ नेरुरकर,विभागीय नेते ( सोलापूर, बीड, धाराशिव, लातूर ) सुनिल प्रभू, सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकिळ यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेकडून हे अभियान राबिण्यात येत आहे.

पंढरपुरात आयोजित भगवा सप्ताह शुभारंभ प्रसंगी बोलताना शिवसेनेचे पंढरपुर विभाग जिल्हा प्रमुख संभाजी शिंदे यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रति निष्ठा असलेल्या शिवसैनिकांनी नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत जीवाचे रान करून माढा आणि सोलापूर लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी मोलाचे योगदान दिल्याचे दिसून आले होते.आता आगामी विधानसभा निवडणुकीत राज्यात सत्तेत असलेल्या अभद्र युतीला आणि मिंधे सरकारला हाकलून लावण्यासाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेच्या सर्व आजी माजी पदाधिकाऱ्यांनी व कट्टर शिवसैनिकांनी सज्ज रहावे असे आवाहन केले.तर यावेळी माढा विभाग सहसंपर्क प्रमुख साईनाथ अभंगराव,युवा सेना सहसचिव स्वप्नील वाघमारे,शहर प्रमुख रवी मुळे, महिला आघाडीच्या जिल्हा प्रमुख ऍड.पूनम अभंगराव यांनीही शिवसैनिकांना मोलाचे मार्गदर्शन केले. या भगवा सप्ताह निमित्त सभासद नोंदणी,गाव तिथे शाखा,घर तेथे शिवसैनिक अभियान राबविणे,मतदार यादीचे वाचन आदी उपक्रमाचा समावेश यात असून शहरात व तालुक्यात गावोगावी भगवा सप्ताह आयोजित करण्यात येणार आहे. माढा लोकसभा सहसंपर्क प्रमुख साईनाथ भाऊ अभंगरावशिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोलापूर जिल्हा प्रमुख ( पंढरपूर विभाग ) संभाजीराजे शिंदे, उपजिल्हा प्रमुख ( ग्रामीण ) जयवंत आण्णा माने, उपजिल्हा प्रमुख ( शहर ) सुधिरभाऊ अभंगराव, युवासेना प्रदेश सहसचिव स्वप्निल वाघमारे, महिला आघाडी जिल्हा संघटिका सौ.पुनम अभंगराव, युवासेना जिल्हा युवाधिकारी गणेश इंगळे, आरोग्य सेना जिल्हा संघटिका सौ.राजश्रीताई क्षीरसागर,पंढरपूर तालुका प्रमुख बंडू घोडके, शहर प्रमुख रविंद्र मुळे,इंद्रजित गोरे,कल्याण कवडे,शिवाजी जाधव,महंमद पठाण,काकासाहेब बुराडे, रणजित कदम,संजय घोडके, नागेश रितुंड, उत्तम कराळे,प्रवीण शिंदे,लंकेश बुराडे,विनय वनारे,सचिन बंदपट्टे,तानाजी मोरे,अविनाश वाळके, संगीता पवार,पूर्वा पांढरे,अनिता आसबे,संजीवनी चुंबळकर,शरीफा पठाण,मंजुळा दोडमिसे,अनिता पटाईत,शीतल आदापुरे, संजय पवार,महेश इंगोले, विजय बागल, लोकमान्य इनामदार,अंकुश माने, बापू कोळे, बाळासाहेब देवकर यांच्यासह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेचे पंढरपूर शहर व तालुक्यातील आजी माजी पदाधिकारी,सर्व महीला आघाडी व युवासेना,वैद्यकीय सेना,वाहतूक सेना,रिक्षा सेना व सर्व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सृष्टी बिळीअंगडी करणार सलग १० तास लाठी फिरवण्याचा विक्रम

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधी: स्वातंत्र्यसैनिक सिद्रामप्पा फुलारी प्रतिष्ठान, सोलापूर संचलित रुद्रशक्ती गुरुकुलची विद्यार्थिनी सृष्टी धानप्पा बिळीअंगडी ही रविवार, ११ ऑगस्ट रोजी सलग १० तास १० मिनिटे १० सेकंद लाठी फिरविण्याचा विश्वविक्रम करणार आहे. या कौशल्याच्या विक्रमाची नोंद इंटरनॅशन एक्सलेंस रेकॉर्ड व इंडिया बुक रेकॉर्डमध्ये होणार आहे. हा विश्वविक्रमाचा कार्यक्रम छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज येथे रविवारी होणार आहे. सृष्टी बिळीअंगडी ही शिवकालीन लाठी फिरवणे या पारंपरिक व ऐतिहासिक खेळाचा विश्वविक्रम करण्यासाठी गेल्या एक वर्षापासून सराव करत आहे. रुद्रशक्ती गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष व प्रमुख मार्गदर्शक योगिनाथ फुलारी तसेच मुख्य प्रशिक्षक विवेक मिस्कीन हे मार्गदर्शन करत आहेत. १३ वर्षाच्या सृष्टीने आतापर्यंत अनेक राज्यस्तरीय, राष्ट्रीय लाठीकाठीची स्पर्धा व त्याचबरोबर कराटे, योंगमुडो स्पर्धा खेळून विशेष प्रावीण्य मिळवले आहे. सध्या सृष्टीचा सलग लाठी फिरवण्याचा सराव लाठी सराव केंद्राच्या प्रशिक्षणस्थळी योगिनाथ फुलारे यांच्या उपस्थितीत सुरु आहे. सद्यःस्थितीला ती ११ तास सलग लाठी फिरवण्याचा सराव करत आहे. इयत्ता सातवीचा अभ्यासक्रम सांभाळत ती सोलापूरच्या नावलौकिकामध्ये भर घालणाऱ्या विश्वविक्रमाची अत्यंत जोमात तयारी करत आहे.



विश्वविक्रमाबद्दल सृष्टी म्हणते की, महाराष्ट्र ही जिजाऊंच्या लेकी व छत्रपती शिवाजी महाराज, अनेक महापुरुषांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी आहे. या भूमीतील मुली व महिला सक्षम व्हाव्यात. हा संदेश घेऊन शिवकालीन लाठी फिरविण्याच्या माध्यमाद्वारे सलग १० तास १० मिनिटे १० सेकंदाचा विश्वविक्रम करणार आहे. जेणेकरून मला पाहून अनेक मुली लाठीकाठी त्याचबरोबर शिवकालीन मर्दानी खेळाकडे आकर्षित होतील व नवीन पिढी मोबाइलच्या विळख्यातून बाहेर पडेल, असा सृष्टीला विश्वास आहे. या विश्वविक्रमासाठी रुद्रशक्ती गुरुकुलचे विद्यार्थी सहकार्य करणार आहेत. याप्रसंगी जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत, मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष मनोहर सपाटे, माजी महापौर महेश कोठे आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. विक्रमाची नोंद वेळ सकाळी ८ ते सायंकाळी ६ अशी आहे. सायंकाळी ६ वाजता सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे.



# नळदुर्ग येथे महामार्ग पोलीस कर्मचाऱ्यांचे आरोग्य तपासणी शिबिर

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

वागदरी/एस.के.गायकवाड : महामार्ग पोलीस केंद्र नळदुर्ग ता.तुळजापूर येथे महामार्ग पोलीस कर्मचाऱ्यांचे आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले. आरोग्य हीच खरी संपत्ती असून आपले आरोग्य चांगले तर सर्वकाही चांगले काम करता येते तेंव्हा आरोग्याची काळजी घेणे ही काळाची गरज आहे.ही खरी गरज ओळखून महामार्ग सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत महामार्ग पोलीस कर्मचाऱ्यांचे आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या प्रसंगी जि.प.प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.एस.एस.कदम,नेत्र चिकित्सा सहाय्यक आनंद काटकर आरोग्य कर्मचारी रमेश शियाले आदीनी या उपस्थित सर्व महामार्ग पोलीस पोलीस कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी केली.यावेळी पोलीस हवालदार रत्नदीप कदम,पो.कॉ.बालाजी बेगडे,राजू चव्हाण, सुर्यकांत गायकवाड, गणेश अतकरे, पंडित शिंदे,जमीर पठाण, पत्रकार ईरफान काझी,एस.के.गायकवाड, किशोर धुमाळ, सुरेश लोंढे वहाण चालक आर.एन.पवार सह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# सुरजभैय्या वनसाळे क्रांतीवीर फकिरा योध्दा पुरस्काराने सन्मानित.



**दैनिक यशसिद्धी न्यूज**

इंदापूर/ अतुल सोनकांबळे: मी आंबेडकरवादी सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुरजभैय्या वनसाळे यांना क्रांतीवीर फकिरा योध्दा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.


सर्व महापुरुष यांच्या संयुक्त जयंती महोत्सवाच्या शुक्रवार दि.९ ऑगस्ट २०२४ रोजी सायं. ७ वाजता जेष्ठ नागरिक संघ सभागृह, बारामती येथे माळेगाव साखर कारखान्याचे अध्यक्ष केशव जगताप, संभाजी होळकर, दशरथ राऊत, विक्रम शेलार, नरेश डाळिंबे यांच्या प्रमुख उपस्थित सुरजभैय्या वनसाळे यांना क्रांतीवीर फकिरा योध्दा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजक सुनील शिंदे, उमेश दुबे, साधु बल्लाळ, संजय वाघमारे यांनी कार्यक्रम यशस्वीते साठी परिश्र घेतले

# सैनिक टाकळी येथे श्रीयळ षष्ठी ही परंपरा जवळ जवळ दिडशे वर्षापुर्वी पासून साजरी

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

पत्रकार नामदेव निर्मळे

सैनिक टाकळी तालुका शिरोळ येथे श्रीयळ षष्ठी ही परंपरा जोपासली जाते. गावातील ४ भावकी मध्ये श्रीयळाचे पुजण केले जाते. गावातील नागरिकांकडून दर्शन घेतले जाते. व सायंकाळी ४ ही श्रीयाळांची गाजत वाजत मिरवणूक काढून त्याचे कृष्णा नदीत विसर्जन केले जाते. श्री. हरिश्र्चंद्र पाटील(भाऊ) माजी उपसभापती पं. स. शिरोळ भाजप कोल्हापूर जिल्हा उपाध्यक्ष उपस्थित होते.



# नगरसेविका राजश्रीताई मखरे यांची आपली नाती आपली माणसं आपला परिवार ग्रूपच्या इंदापूर शहरातील संपर्क कार्यालयास सदिच्छा भेट



**दैनिक यशसिद्धी न्यूज**

इंदापूर/अतुल सोनकांबळे: आपली नाती आपली माणसं आपला परिवार ग्रूपच्या इंदापूर येथील संपर्क कार्यालयास मा.प्रा. अशोक मखरे (सर) व मा. सौ. राजश्री अशोक मखरे नगरसेविका तथा माजी आरोग्य सभापती इंदापूर नगरपरिषद, इंदापूर यांनी सदिच्छा भेट दिली. आपली नाती आपली माणसं आपला परिवार ग्रूप चे मार्गदर्शक भिमराव शिंदे यांच्या कडे संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजनेचे १००० फॉर्म भेट दिले. व भविष्यात काही मदत लागल्यास आपण ती मदत देऊ अशी भावना व्यक्त केली. यावेळी आपली नाती आपली माणसं आपला परिवार ग्रूपचे आधारस्तंभ बाहुबली आण्णा गवळी राऊसाहेब, संस्थापक अध्यक्ष आयु महादेव लोंढे, महिला तालुका अध्यक्ष लताताई उबाळे, ज्योती ताई भोरे, व इतर पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांना पोपट नाना जगताप यांनी चहा पिण्याची व्यवस्था केली.

# नंगपूरा-मुर्री निवासी शाळेत योगाभ्यासाचे प्रशिक्षण...!

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

गोदिंया : जवळील नंगपूरा-मुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळेत (दि. १०) शनिवारी सकाळी पारिपाठ तासिका नंतर योगभ्यासाचे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी शाळेतील मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांच्या प्रमुख उपस्थितीत शाळेचे शिक्षक प्रदिप ढवळे, नीता भलमे, साधना पारधी, अस्मिता तेलंग, मुन्नाभाई नंदागवळी, कार्तिक शहारे, स्वाती राणा, अर्चना चव्हाण आदी होते.



जिल्हा परिषद गोदिंया अंतर्गत सुरू असणाऱ्या योग सत्राच्या सहभागात योग शिक्षिका मनिषा ज्ञानेश पशिने यांनी सदर शाळेतील वर्ग सहावी ते दहावीमधील विद्यार्थ्यांना योगाचे उत्तम प्रशिक्षण दिले. यामध्ये प्राणायम, सूर्यनमस्कार अशाप्रकारे अनेक योगासने सादर करण्यात आले. योगा करण्यामुळे शारीरिक दुखपती, दुखणे अशा सर्व लहान मोठ्या आजारावर उपचार केले जाते. योगासने नियमित केल्याने शारीरिक हे उत्तम कार्यरत असते. शरिरातील विकार लवकर बाहेर होतात. असे महत्त्वही याप्रसंगी विद्यार्थ्यांना सांगितले आहे.

# कलम ३७० हटवील्यामुळे जम्मू काश्मीर मध्ये उद्योग आणि रोजगार वाढत आहे : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

## जम्मू काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा यांची केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवलेंनी घेतली भेट

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

श्रीनगर : रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री नामदार रामदास आठवले यांनी आज जम्मू-कश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा यांची सदिच्छा भेट घेतली या भेटीत वय नेत्यांनी जम्मू-काश्मीरच्या सामाजिक शैक्षणिक आर्थिक आणि राजकीय घडामोडींवर चर्चा केली केंद्रीय सामाजिक न्याय मंत्रालयातर्फे विविध योजनांद्वारे जम्मू काश्मीरमधील जनतेचा विकास घडविण्याबाबत यावेळी नामदार रामदास आठवले यांनी चर्चा केली.



उपराज्यपाल मनोज चिन्हा यांनी केंद्रीय राज्यमंत्री नामदार रामदास आठवले यांना दिले

जम्मू काश्मीर मध्ये कलम ३७० पाठविल्यामुळे या भागात गुंतवणूक वाढत असून उद्योगधंदे उभारले जात आहेत उद्योग व्यापार जम्मू-काश्मीरमध्ये चांगल्या प्रमाणात वाढत असल्यामुळे दर महिन्याला येथील बेरोजगारांना रोजगार देण्यासाठी आम्ही नोकर भरती करीत आहोत अशी माहिती जम्मू-काश्मीरची

जम्मू काश्मीरमध्ये आता पूर्ण शांतता आहे लोकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे जम्मू-काश्मीरमध्ये उद्योग व्यवसाय वाढत असल्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळत आहे आणि त्या त्यामुळे लोकांनी आनंदाने समाधान व्यक्त केले आहे अशी माहिती नामदार रामदास आठवले यांनी दिली

जम्मू काश्मीरच्या २० जिल्ह्यांपैकी १६ जिल्ह्यांमध्ये ओल्ड एज होम आहेत. उरलेल्या चार जिल्ह्यांमध्ये लवकरच ओल्ड एज होम केंद्र सरकारच्या समाज कल्याण विभागातर्फे सुरू करण्यात येतील असे आश्र्वासन ना.रामदास आठवले यांनी दिले जम्मू कश्मीरच्या दौऱ्यावर आले असता नामदार रामदास आठवले यांनी श्रीनगर येथे सामाजिक न्याय विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली या बैठकीत जम्मू काश्मीरमधील दिव्यांग जन वरिष्ठ नागरिक ज्येष्ठ नागरिक अनुसूचित जाती ओबीसी यांच्या कल्याणासाठी केंद्र सरकार तर्फे राबवण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा आढावा घेतला यावेळी ट्रान्सजेंडर आणि दिव्यांग जणांच्या कल्याणासाठी विविध योजनांचा लाभ या सर्व समाज घटकांपर्यंत पोहोचवण्याचे निर्देश नामदार रामदास आठवले यांनी अधिकारी वर्गाला दिले. केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय विभागातर्फे लवकरच जम्मू-काश्मीरमधील दृष्टीहीन कर्णबधिर या दिव्यांगांसाठी विद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात येईल सरकार आणि सामाजिक संस्थेच्या वतीने जम्मू-काश्मीरमध्ये दिव्यांग जनांसाठी विद्यालय उभारण्यात येईल असे आश्र्वासन नामदार रामदास आठवले यांनी यावेळी दिले काश्मीर मध्ये एकूण ९० जागा या विधानसभा निवडणुकीसाठी निश्र्चित करण्यात येणार आहेत त्यासाठी निवडणूक आयोग चे एक पथक जम्मू-काश्मीरच्या दौऱ्यावर आले असून जम्मू-कश्मीरच्या विधानसभा निवडणुकीची पूर्वतयारी करीत आहे जम्मू काश्मीरला लवकरच राज्याचा दर्जा देण्याबाबतचा निर्णय होणार आहे महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीसोबतच जम्मू काश्मीरच्या ही विधानसभा निवडणुका या वर्षाखेरीस होतील असा आपला अंदाज असल्याचे नामदार रामदास आठवले यांनी सांगितले.

जम्मू काश्मीरच्या दौऱ्यात श्रीनगर येथे पोलो ग्राउंड वर पहिल्यांदाच सुरू करण्यात आलेल्या काश्मीर हॉकी टूर्नामेंटचे उद्घाटन केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांच्या हस्ते करण्यात आले.